Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

अदिलशाही शासकांचे धार्मीक धोरण

एस. के. लदाफ
अधिव्याख्याता, इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय, औसा, लातुर (महाराष्ट्र).

सारांश:

अदिलशाही शासकाने हिंदु लोकांविषयी समान धोरणामुळे राज्यात दोघाचे मिळून एक संस्कृती तयार झाली. कला आणि वास्तु ला यामध्ये दोघांनी पण योगदान दिले. तसेच भाषे बद्दल ती हिंदुस्तानी असो, ऊर्दु असो अदिलशाही शासकाने दोघांना पण राजाश्रय दिला. त्याच बरोबर हिंदु व मुस्लिमच्या चांगल्या संबंधामुळे समाजाचा विकास होत राहिला. धर्म परंपरा रितीरिवाज या बाबत दोन्ही ही समाज एकत्रीत आले. त्यांचे मतभेद टळले आणि जुने विचार टाकून दिले. दोघांनी पण स्वत:ची ओळख जपुन विजापूर राज्याचे आधार स्तंभ बनले आणि दोघे पण राज्याशी एकनिष्ठ होते. एकंदरित अदिलशाही शासकाचे धार्मीक धोरण उदारमतवादी आणि संहिष्णु वृत्तीचे होते. त्याने हिंदुना प्रशासनात मानाचे स्थान दिले होते.

प्रस्तावना :

आदिलशाही सुलतानाच्या श्रद्धा सतत बदलत राहिल्या. त्याने कधी शिया तर कधी सुन्नी पंथ स्विकारला युसूफ अदिलशहा, ईस्माइल, मल्लु आणि अलिअदिलशहा पहिला, अलिअदिलशहा दुसरा हे शिया पंथाचे पुरस्कर्ते होते. तर इब्राहीम अदिलशहा पहिला आणि इब्राहीम अदिलशहा दुसरा, मोहम्मद अदिलशहा, सिकंदर अदिलशहा हे सुन्नी पंथाचे पुरस्कर्ते होते. अदिलशहा पहिला आणि इब्राहीम अदिलशहा दुसरा या दोघांनी हिंदु धर्म, पुजारी, सन्यासी मध्ये खुप रस दाखविला सर्व अदिलशाही सुलतान धार्मीक बाबतीत उदार होते. आणि त्यानी आपल्या प्रजेला धार्मीक स्वातंत्र्य दिले. इब्राहीम अदिलशहा दुसरा हा एक अत्यंत थोर राजा होता. त्याने उदार धोरणाच्या बाबतीत त्याचा समकालीन अकबराला पण मागे टाकले तो नेहमी सुफी संताच्या सहवासात आढळून येत असे. सुफी संतांना तो मार्गदर्शक मानायचा. डॉ. मोतीचंद्र यांच्या मते इब्राहीम अदिलशहा दुसरा कदाचित या काळाच्या नाथपंतीय संताच्या सुद्धा संपर्कात आला असावा तो योगी रुकमंगदा पंडितच्या भेटीला जात असे आणि हिंदु तत्वज्ञानाचा त्याचावर बराच प्रभाव पडला होता. त्याच्या किताब-इ--वरस या पुस्तकात सरस्वती, गणपती, शिवा त्याची पत्नी पार्वती, भैरव याची स्तुती केली आहे. त्याचे काही शिलालेख गणपती आणि कृष्णाच्या प्रार्थनेने सुरु होतात. त्याच्या कार्यकाळात विजापूरमध्ये नरसोबाचे मंदिर बांधण्यात आले इब्राहीम दुसरा त्याला त्याच्या धर्मनिरपक्षते बद्दल ओळखले जाते. इ.स. १६१४ च्या एका आदेशानुसार त्याने नळदुर्ग मध्ये हिंदु देवता खंडेराव किंवा मल्लारी याचे नावे असलेली वार्षीक जत्रा पुन्हा भरवण्यासाठी चे आदेश दिले. गोकर्ण विवरणा एका पानावर एक हस्त लिखित लिहिले आहे कि हे हस्त लिखित मद्रास ओरियन्टल ग्रंथालय (लायब्ररी) यांच्याकडे सुरक्षित आहे. या पानावरच्या लिखानानुसार इब्राहीम दुसज्याच्या अधिकार शरीफ मलिक याने ोकर्णीला मंदिराला मदत केली. इ.स. १६१८ ते १६१९ मध्ये इब्राहीम अदिलशहा दुसज्याने चिचवडच्या हिंदु मंदिराच्या खर्च भागवण्यासाठी जमिन दान दिली. इ.स. २ ऑगस्ट १६५७ च्या एका फरमान नुसार कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदीराला अदिलशाही सुल्तान दर वर्षी दहा हुन्नस (सुवर्ण मुद्रा) एवढी मदत देत. असा उल्लेख आहे.[१]

आपल्या हुशार बापा प्रमाणेच मोहम्मद अदिलशहा धार्मीक बाबतीत उदार होता. कर्नाटकच्या चिकमंगळुर जिल्ह्यातील श्रींगेरी मठात एक पत्र आहे (इ.स. १६४०). या पत्रानुसार हे पत्र रनदुल्लाखॉन ने हे पत्र स्वामी सचिदानंद भारती यांना लिहिले आहे. तो म्हणतो कि, त्याने अदिलशाही अधिकाज्यांना अशा सुचना दिल्या आहेत कि, मंदिराला दान केलेल्या जमिनीचे उत्पन्नावर कर जमा करण्या करिता स्वामीच्या आज्ञाचे पालन केले जावे. पत्र खालील वाक्याने संपते.

'तुम्ही (स्वामी) आम्हाला तुम्हाला कोणत्या प्रकारची मदत पाहिजे आणि किती मदत पाहिजे यासाठीचे पत्र -हेमी लिहिले पाहिजे.'

इ.स. १६५६ च्या त्याच मठामधील एका कागद पत्रानुसार अदिलशाही सरकार असदउल्लाखॉन याने झुल्लुकंटी गावाचा सर्व शेतसारा आणि सोने तलाव याच्यापासून मिळणारे उत्पन्न श्रीरंगरी मठाला द्यावे असा आदेश दिला. इ.स. १६४० च्या मोहम्मद अदिलशहाच्या फरमाना नुसार (तांब्याच्या प्लेटवर) लिहीले आहे. रत्नागीरी जिल्ह्यातील लांझी तालुक्या मधील सातवली गावच्या विठोबा मंदिरासाठी जमिन दान देण्यात आली. हे पण पुराव्यानुसार सिद्ध करता येते. मोहम्मद अदिलशहाने कंकालेश्वर मंदिर आणि त्याच्या पुजारीचा खर्च भागविण्या करिता दानधर्म केला. त्याने चौऊल मधील रामेश्वर मंदिराला पण मदत केली. सिकंदर सुलतानाच्या इ.स.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

१६७८ मधील ए□ा फरमाना नुसार हवलदार आणि अधिकारी बदामी किल्ला यांनी बन्नेसंकरी देवतेच्या जत्रा आयोजनासाठी चुलचगड □ावचा कर वापरण्यात यावा असे आदेश दिले.[२]

राज्यामध्ये ख्रिश्चन समाज मोठ्या प्रमाणात रहात असे. कॅप्टन मडोज टेलर आणि जेम्स फरग्युसन म्हणतात कि, ख्रिश्चन मिशनरी लोकांना दरबारात मुफ्त प्रवेश होता. चितपुर, रायचुर आणि मुदगल या ठिकाणी चर्च सोबत शाळा आहेत ज्या लोकांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला ते प्रामुख्याने विनकर आहेत. इब्राहीम दुसरा आणि मोहम्मद अदिलशहा यांच्या फरमाना नुसार जमिनी दान करण्यात येत असत आणि धार्मीक कार्यासाठी जमा होत असलेल्या करा मधून कांही भाग काढून ठेवण्यात येत असे. जेम्स डगलस त्यांच्या 'बॉम्बे आणि वेस्टर्न इंडिया' या पुस्तकात लिहितो कि, जेंव्हा स्मीथफिल्ड या ठिकाणी गोव्यामध्ये चर्च जाळण्यात आले. त्या वेळेस रायचुर आणि नळदुर्ग मध्ये ख्रिश्चन लोकांची कत्तल करण्यात आली नाही तर त्यांच्या उलट ख्रिश्चन लोकांना मदत करावी अशा आदेशाचे फरमान आज ही आहे. राजयामध्ये मंदिर आणि त्यांच्या पुजाज्याचा खर्च भागावा म्हणून त्याच्या लगदच्या जमिनी त्यांना दान देण्यात येत असे आणि त्याच्या पासूनचे उत्पन्न मंदिरा करिता वापरले जात असे.[३]

दाभोळ परिसरात अशी एक प्रथा अस्तित्वात होती कि, जर हिंदु व्यक्तिचा मृत्यु वारसदारा शिवाय झाला तर त्याची मालमत्ता राज्याकडे जमा होईल. या प्रथेमुळे अनेक हिंदु लोकांना कष्ट सोसावे लागले आणि जेंव्हा मोहम्मद अदिलशहाकडे या विषयी विनंती □रण्यात आली त्याने हा कायदा इ.स. १६५१ मध्ये बंद केला. यामुळे हिंदु समाजाचा फायदा झाला. एका शिलालेखा द्वारे विजापूर मधील शहापूरच्या हिंदु लोकांना खात्री देण्यात आले कि वारसदारा शिवाय जर हिंदु व्यक्तिंचा मृत्यु झाला तर त्याची मालमत्ता जप्त करण्यात येणार नाही. इब्राहीम जुबेरी लिहितो कि जेंव्हा मोहम्मद अदिलशहाला कळाले कि विजापूर मधील ब्राह्मण दिवसातून ए□दाच जेवन करु शकतात त्याने ब्राह्मण हल्ली या गावची जहागीरी ब्राह्मणाना दिली. नाईकवाडे लोकांनी महाजन जमातीतल्या लोकांचा अपमान केला जेंव्हा महाजन लोक अल्लापुर प्रवेश द्वारा मधुन जात होते. नाईकवाडे लोकांनी त्याचा अपमान केला ही तक्रार प्राप्त झाल्यानंतर मोहम्मद अदिलशहाने महाजन लोकांसाठी पुर्वेला बादशहापुर प्रवेश द्वार बांधले त्या सोबतच डॉ. मोतीचंद्र यांच्या कडे एक चित्र आहे. त्यामध्ये मोहम्मद सुलतान योगी सोबत चर्चा करताना दिसून येता. या चित्रा वरुन सुलतानाचे योगी बरोबरीचे संबंध आणि धर्म निरपेक्षीता दिसून येते तथापि कांही विदवान, इतिहासकार जसे की जदुनाद सरकार, जहिरोद्दीन फारुखी, पी.एम. जोशी, सुलतान मोहम्मदाला असंहिष्णु आणि लहरी माणतात. त्यासाठी जिजियाकर आणि दक्षिणेतील त्यांच्या जिहाद मोहिमेचा आधार देतात. विजापूर दरबाराच्या, दस्तुर-इ-अमल याच्या नुसार राज्यकर्त्यानी कोणती कामे करावीत हे सांगितले आहेत. यात जिजिया विषयी लिहिले आहेत परंतु मोहम्मद अदिलशहाने प्रत्यक्षात जिजियाकर लावला का ? हा प्रश्न आहे. कोणत्याही कागदपत्रा मध्ये मोहम्मद जिजियाकर लावला असा उल्लेख लावला नाही. जिहाद विषयी बोलायचे तर त्याने दक्षिण मोहिमे करिता जिहाद शब्द वापरला. त्या मागचे कारण म्हणजे सैनिका मध्ये उत्साह आणि चैतन्य निर्माण व्हावे. शिवाय मोगल लोकांना चिडविण्यासाठी पण कारण मोगल विजापूर सुलतानांना दुनियादार असे म्हणत असत. तसे पाहिले तर सुलतान मोहम्मद ने दक्षिण मोहिमेचे जबाबदारी शहाजी आणि इतरांना दिली होती. या मोहिमे दरम्यान आपल्याला मंदिर नष्ट करायचे किंवा धर्मांतराचे कोणतेही उदाहरण दिसत नाही. अशा प्रकारे सुलतान मोहम्मदची दक्षिण मोहिम ही दोन संस्कृतीचा मिलाप करणारी होती.[४]

पंढरपूर, कोल्हापूर, तुळजापूर, हिप्परगी, सौदंती या देवता राज्यात होत्या आणि हिंदु लोकांचे ते पवित्र स्थळ होते. विजापूरच्या आसपासच अनेक हिंदु मंदिरे आहेत जे अदिलशहाच्या काळात बांधले गेले. कुमटगीचे हनुमान मंदिर बुज्हाणपुरचे हनुमान मंदिर हे उदाहरण आहे. हिंदु लोकांचे दिवाळी, दसरा असे सर्व सण आनंदाने साजरा करित असत.[५]

आणखी म्हणजे युसूफ अदिलशहाने एक हिंदु स्त्री शी लग्न केले अलिअदिलशहा पहिल्याची आई हिंदु होती. दासु पंडित ने त्याची मुलगी इब्राहीम अदिलशहा दुसरा याला दिली आणि सावंतराव नाईकवाडे याने त्यांची मुलगी ईस्माइल अदिलशहाला दिली. या विवाहानी राज्य धार्मीक दृष्ट्या उदार होते. हे स्पष्ट होते कि राज्यामध्ये नाथपंथाचे लोक जसे कि मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, गणपतीनाथ यांचा प्रभाव खुप होता. लोक त्यांचा अत्यंत आदर करित असत विजापूरच्या सुफी संतांनी राज्याच्या सामाजिक बांधणी करिता योगदान दिले. त्यांच्यामुळे राज्यात शांतता आणि एकात्मता होती. सुलताना वर आणि जनतेवर त्याचा सारखाच प्रभाव होता यामध्ये महत्वाचे नावे म्हणजे शहामिरजी शमसुन पंतखाँब-ऊद-बि-ा-□ादरी शाहसि बाग तुल्ला, अब्दुल रजा कादरी कासीम कादरी बुज्हाणोद्दीन जनम, सय्यद हाशीमपीर, अमीरोद्दीन आला, अब्दुल हसन कादरी आहेत.[६]

वरील सर्व पुरावे स्पष्ट सांगतात कि अदिलशाही राज्याचे राजकीय धोरण उदारमतवादी आणि संहिष्णु होते. हिंदुना प्रशासनास मानाचे स्थान होते. मुस्लिम धर्म क्षेत्रा पेक्षा हिंदु धर्म क्षेत्रांना जास्त मदत मिळत असे.

संदर्भ□थ:

१. अब्दुल गणी इमारत वाले व रज्जाक अहेमद किल्लेदार, Studies in Medieval Bijapur, Publisher Tanzim Raza Qureshi, Kuch Chellan Daryaganj, New Delhi, p.५३.
२. □□त्ता, पृ. ५३-५४.
३. □□त्ता, पृ. ५४.
४. □□त्ता, पृ. ५४.
५. □□त्ता, पृ. ५४-५५.
६. □□त्ता, पृ. ५५.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

संदर्भ□थ:

१. Siddigi Mohammad Suleman, The Bahamani Suffis, Delhi.
२. Mangalam S. J. & Kanth, M. R., Grant of Mohumand Adilshah to the Temple of Vithoba, Bulletin of Deccan College, Pune.
३. Eaton Richords Maxwell. Suffis of Bijapur, New Delhi.
४. Khare G. H., Maharashtraanch char Deveate, Pune, १९५८.
५. Khare G. H., Shri Vittal Aani Pandarpur, Pune.
६. Moulana Mohummad Abdul Kalam Ahsamul Quadri. Urus Kya hai? Urdu Howdah, १९७७.
७. Mohummad Abdul Jabbar Malkapur. Tazkira-Awalia Dakan, Part-I.
८. Nizami K. A., Suffi Movement in the Deccan.
९. डॉ. अनिल कठारे व डॉ. एन. बंडाळे, मध्ययुगीन भारत, प्रथम आवृत्ती, कल्पना प्रकाशन, शिवाजी नगर, नांदेड.
१०. मदन मार्डीकर. मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्रथम आवृत्ती, श्रीकांत पिपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.
११. माटे म. श्री., मध्ययुगीन महाराष्ट्र आ□ सामाजिक संस्कृतीक जिवन, एन. चंद्र ॲन्ड कंपनी, नई दिल्ली.
१२. □टे भ.ग., अहमदनगरची निजामशाही, संकेत प्रकाशन, जालना.
१३. □टे भ.ग., बहमनी राज्याचा इतिहास, संकेत प्रकाशन, जालना.
१४. मद-ा मार्डीकर, मोगलकालीन भारत, द्वितीय आवृत्ती.
१५. विजया साखरे व अनिल कठारे, मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्रथम आवृत्ती-१९९७.
१६. विजया साखरे व अनिल कठारे, भारताचा इतिहास, प्रथम आवृत्ती, एज्युकेशन पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स- औरंगपुरा, औरंगाबाद.
१७. बशीर अहेमद देहली, वाकियाते-ममलेकात-ए-विजापूर, खंड तिसरा, प्रकाशक कर्नाटक उर्दू ॲकॅडमी, फेब्रूवारी २०१४.
१८. अब्दुल महंमद मौलुस, तारिखे-सलातीन बहमनियॉ व बरीदिया अलिम शरफी, बिदर, कर्नाटक.
ाम , इंद्रायणी प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती , पृ.क्र.२१